# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३१/०१/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत ८ कि.मी. अंतरावरील बोरगाव येथे दिनांक ३०/०१/२०२२ चे ०१.३० वा. ते ०५.०० वा. दरम्यान **सदानंद पूंडलिक मेश्राम (मृतक), वय ४५ वर्ष, रा.बोरगाव** हा मानसिक रूग्ण आहे. मृतक हा फिर्यादीचे मोठे वडील यांना शेतातील विहरीत पाण्यात तरंगताना मृत अवस्थेत दिसून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आशिष गोतम मेश्राम, वय २८ वर्ष, रा. बोरगाव यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार पवार ९८२३०३७२७९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील शनि चौक काटोल येथे दिनांक ३०/०१/२२ चे ०६.३० वा. पुर्वी दरम्यान फिर्यादीचे भाउ **सुभाष भागवतराव तभाने (मृतक), वय ४२ वर्ष रा. शनिचौक काटोल** हा दारू पिण्याचे सवईचे होता. तो व त्याची पत्नी मध्ये पटत नसल्याने एक महिन्यापासून नागपुर येथे वेगळा राहत होता. मुलीचा वाढदिवस असल्याने तो काटोल येथे आला होता. फिर्यादीचे गावातील मुलगा सचिन डफर याने फोन करून सांगीतले की, 'तुमच्या भावासारखा एक ईसम शनि चौक काटोल येथे मरण पावलेला दिसत आहे' त्यादरम्यान त्याने फोटो काढून फिर्यादीचे मोबाईलवर पाठविले असता फिर्यादीचा भाउ सुभाष तभाने असल्याचे समझले. या माहितीवरून फिर्यादी हे शनिचौक काटोल येथे आले असता, मृतक हा मंदिराजवळील बेंचवर बसलेल्या अवस्थेत मरण पावलेला दिसला. मृतकाचे प्रेत ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– भास्कर भागवतराव तभाने वय ४७ वर्ष रा. रिधोरा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रभुदास दलाल मो. नं. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर